# महाराष्ट्र गृहनिर्माण विकास महामंडळ

## पदांसाठी निश्चित करण्यात आलेली शैक्षणिक अर्हता व अनुभव -

| क्र. | पदनाम | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|
| १ | **संचालक (तांत्रिक)** | **शैक्षणिक पात्रता:** महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त विद्यापीठातील स्थापत्य अथवा बांधकाम शाखेतील पदवी धारण केलेली असावी. मान्यताप्राप्त विद्यापीठाची एमई/ एमटेक / बी.ई. सिव्हिल / बी. टेक, सिव्हिल इंजिनीअरिंग पदवी धारण केलेली असावी. एमई/ एमटेक यांना प्राधान्य दिले जाईल.<br>**अनुभव व कार्ये :-**<br>— शासकीय/निमशासकीय/मंडळे/महामंडळे/सरकारी उपक्रमे इ..कार्यालयातून संचालक (तांत्रिक) अथवा अधिक्षक अभियंता (Superintendent Engineer) किंवा मुख्य अभियंता म्हणून सेवानिवृत्त.<br>— शासकीय/निमशासकीय/मंडळे/महामंडळे/सरकारी उपक्रमे इ.. कार्यालयातील अधिक्षक अभियंता (Superintendent Engineer) किंवा मुख्य अभियंता म्हणून किमान ०७ वर्षाचा अनुभव आवश्यक. **(अर्जदाराचे वय ६२ वर्षांपेक्षा जास्त नसावे)**<br>— शासकीय/निमशासकीय/मंडळे/महामंडळे/सरकारी उपक्रमे इ..कार्यालयातील किमान २० वर्षापेक्षा जास्त कालावधीचा गृहनिर्माण व नागरी बांधकाम क्षेत्रातील विशेषत: Mivan व तत्सम आधुनिक मोठया आकारमानाचे गृहप्रकल्प बांधकाम तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष कार्यक्षेत्रावरील (Site) कामाचा अनुभव असावा.<br>— Unified Development Control and Promotion Regulations (DCPR), Development Control and Promotion Regulations २०३४ (DCPR), याबाबत अद्ययावत ज्ञान असणे आवश्यक आहे.<br>— केंद्रशासनाच्या व राज्यशासनाचे विविध मोठया आकारमानाच्या गृहनिर्माण योजना राबविण्याचा, मंजुरी प्राप्त करण्याचा, पर्यवेक्षणाचा, विश्लेषणाचा अनुभव असणे आवश्यक.<br>— प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे, PPP, JV प्रकल्प, SRA प्रकल्प, पुनर्विकास प्रकल्प हाताळण्याचा अनुभव आवश्यक.<br>— प्रकल्प निविदा पध्दतीने (PPP, BOT, C&DA, DM Model व तत्सम) राबविण्याचा अनुभव आवश्यक.<br>— म.न.पा., न.पा., खाजगी विकासक यांचे प्रकल्प प्रस्ताव अहवाल तपासणे, सादरीकरण, मंजुरी, इ..<br>— प्रकल्प मंजूर प्रकल्प किंमतीत व वेळेत पूर्ण करण्यासाठी विविध व्यवस्थापन पर्यायाचा वापर.<br>— केंद्र व राज्य शासन मान्यता प्राप्त नवीन तंत्रज्ञानावर आधारित (New / Modern Technology) बांधकामाचा अभ्यास व अनुभव असावा.<br>— प्रकल्पाकरिता आवश्यक कर्ज प्रक्रिया मंजुरीचा अनुभव आवश्यक.<br>— पीएमसी / कंत्राटदारांचे पर्यवेक्षण.<br>— विक्रते, सल्लागार, ग्राहक, पुरवठादार आणि उपसंविदाकारांसोबत कराराचे पुनरावलोकन आणि पुनरावृत्ती.<br>— गुणवत्ता नियंत्रण कार्यक्रम विकसित आणि अंमलबजावणी.<br>— बिल्डिंग कोड / प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीनुसार नियोजन. |

| | | |
|---|---|---|
| | | — सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या विरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी तसेच वर्तणूकीबाबतचा खटला चालू नसावा.<br>— उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असावे. |
| २ | **कार्यकारी अभियंता (स्थापत्य)** | **शैक्षणिक पात्रता:** महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त विद्यापीठातील स्थापत्य अथवा बांधकाम शाखेतील पदवी धारण केलेली असावी. मान्यताप्राप्त विद्यापीठाची एमई/ एमटेक / बी.ई. सिव्हिल / बी. टेक, सिव्हिल इंजिनीअरिंग पदवी धारण केलेली असावी. एमई/ एमटेक यांना प्राधान्य दिले जाईल.<br>**अनुभव व कार्ये :-**<br>— शासकीय/निमशासकीय/मंडळे/महामंडळे/सरकारी उपक्रमे इ..कार्यालयातून मुख्य अभियंता म्हणून सेवानिवृत्त.<br>— शासकीय/निमशासकीय/मंडळे/महामंडळे/सरकारी उपक्रमे इ.. कार्यालयातील उपअभियंता अथवा समकक्ष पदावरील किमान ०७ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक. **(अर्जदाराचे वय ६२ वर्षापेक्षा जास्त नसावे)**<br>— शासकीय/निमशासकीय/मंडळे/महामंडळे/सरकारी उपक्रमे इ..कार्यालयातील किमान १५ वर्षापेक्षा जास्त कालावधीचा गृहनिर्माण व नागरी बांधकाम क्षेत्रातील विशेषत: Mivan व तत्सम आधुनिक मोठया आकारमानाचे गृहप्रकल्प बांधकाम तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष कार्यक्षेत्रावरील (Site) कामाचा अनुभव असावा.<br>— Unified Development Control and Promotion Regulations (DCPR), Development Control and Promotion Regulations २०३४ (DCPR), याबाबत अद्ययावत ज्ञान असणे आवश्यक आहे.<br>— केंद्रशासनाच्या व राज्यशासनाचे विविध गृहनिर्माण योजना राबविण्याचा, मंजुरी प्राप्त करण्याचा, पर्यवेक्षणाचा, विश्लेषणाचा अनुभव असणे आवश्यक.<br>— प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे, PPP, JV प्रकल्प, SRA प्रकल्प, पुनर्विकास प्रकल्प हाताळण्याचा अनुभव आवश्यक.<br>— प्रकल्प निविदा पध्दतीने (PPP, BOT, C&DA, DM Model व तत्सम) राबविण्याचा अनुभव आवश्यक.<br>— म.न.पा., न.पा., खाजगी विकासक यांचे प्रकल्प प्रस्ताव अहवाल तपासणे, सादरीकरण, मंजुरी, इ..<br>— प्रकल्प मंजूर प्रकल्प किंमतीत व वेळेत पूर्ण करण्यासाठी विविध व्यवस्थापन पर्यायाचा वापर.<br>— केंद्र व राज्य शासन मान्यता प्राप्त नवीन तंत्रज्ञानावर आधारित (New / Modern Technology) बांधकामाचा अभ्यास व अनुभव असावा.<br>— प्रकल्पाकरिता आवश्यक कर्ज प्रक्रिया मंजुरीचा अनुभव आवश्यक.<br>— पीएमसी / कंत्राटदारांचे पर्यवेक्षण.<br>— विक्रेते, सल्लागार, ग्राहक, पुरवठादार आणि उपसंविदाकारांसोबत कराराचे पुनरावलोकन आणि पुनरावृत्ती.<br>— गुणवत्ता नियंत्रण कार्यक्रम विकसित आणि अंमलबजावणी.<br>— बिल्डिंग कोड / प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीनुसार नियोजन.<br>— सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या विरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी तसेच वर्तणूकीबाबतचा खटला चालू नसावा.<br>— उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असावे. |

| | | |
|---|---|---|
| ३ | **उपअभियंता (स्थापत्य)** | **शैक्षणिक पात्रता:** महाराष्ट्र शासन मान्य विद्यापीठातील स्थापत्य अथवा बांधकाम शाखेतील पदवी धारण केलेली असावी. मान्यताप्राप्त विद्यापीठाची एमई/ एमटेक / बी.ई. सिव्हिल / बी. टेक, सिव्हिल इंजिनीअरिंग पदवी धारण केलेली असावी. एमई/ एमटेक यांना प्राधान्य दिले जाईल.<br>**अनुभव व कार्ये :-**<br>– शासकीय/निमशासकीय/मंडळे/महामंडळे/सरकारी उपक्रमे कार्यालयातील १० वर्षापेक्षा जास्त कालावधीचा कामाचा अनुभव असावा.<br>– गृहनिर्माण व नागरी बांधकाम क्षेत्रातील विशेषत: Mivan बांधकाम तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष कार्यक्षेत्रावरील (Site) किमान ०७ वर्षाचा अनुभव.<br>– Unified Development Control and Promotion Regulations (DCPR), Development Control and Promotion Regulations २०३४ (DCPR), याबाबत अद्ययावत ज्ञान असणे आवश्यक आहे.<br>– केंद्रशासनाच्या व राज्यशासनाचे विविध गृहनिर्माण धोरण राबविण्याचा, मंजुरी प्राप्त करण्याचा, पर्यवेक्षणाचा, विश्लेषणाचा अनुभव असणे आवश्यक.<br>– प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे, PPP, JV प्रकल्प, SRA प्रकल्प, पुनर्विकास प्रकल्प हाताळण्याचा अनुभव आवश्यक.<br>– प्रकल्प निविदा पध्दतीने (PPP, BOT, C&DA, DM Model व तत्सम) राबविण्याचा अनुभव आवश्यक.<br>– म.न.पा., न.पा., खाजगी विकासक यांचे प्रकल्प प्रस्ताव अहवाल तपासणे, सादरीकरण, मंजुरी, लेखाजोखा ठेवणे, इ..<br>– प्रकल्प मंजूर प्रकल्प किंमतीत व वेळेत पूर्ण करण्यासाठी विविध व्यवस्थापन पर्यायाचा वापर.<br>– केंद्र व राज्य शासन मान्यता प्राप्त नवीन तंत्रज्ञानावर आधारित (New / Modern Technology) बांधकामाचा अभ्यास व अनुभव असावा.<br>– प्रकल्पाकरिता आवश्यक कर्ज प्रक्रिया मंजुरीचा अनुभव आवश्यक.<br>– पीएमसी / कंत्राटदारांचे पर्यवेक्षण.<br>– पीएमसी / कंत्राटदार यांची देयके तपासणे.<br>– विक्रते, सल्लागार, ग्राहक, पुरवठादार आणि उपसंविदाकारांसोबत कराराचे पुनरावलोकन आणि पुनरावृत्ती.<br>– गुणवत्ता नियंत्रण कार्यक्रम विकसित आणि अंमलबजावणी.<br>– बिल्डिंग कोड / प्रचलित विकास नियत्रंण नियमावलीनुसार नियोजन.<br>– AUTOCAD चे ज्ञान असणे आवश्यक आहे.<br>– उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असावे. |
| ४ | **कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)** | **शैक्षणिक पात्रता:** महाराष्ट्र शासन मान्य विद्यापीठातील स्थापत्य शाखेतील पदविका (Diploma / BE - Civil Engineering / B. Tech) धारण केलेली असावी.<br>**अनुभव व कार्ये :-**<br>– शासकीय/निमशासकीय/मंडळे/महामंडळे/सरकारी उपक्रमे अथवा नोंदणीकृत सुप्रस्थापित खाजगी कंपनी/ फर्म इ.. कार्यालयातील ७ वर्षापेक्षा जास्त कालावधीचा कामाचा अनुभव असावा.<br>– गृहनिर्माण व नागरी बांधकाम क्षेत्रातील विशेषत: Mivan बांधकाम तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष कार्यक्षेत्रावरील (Site) किमान ०५ वर्षाचा अनुभव. |

| | | |
|---|---|---|
| | | — Unified Development Control and Promotion Regulations (DCPR), Development Control and Promotion Regulations २०३४ (DCPR), याबाबत अद्ययावत ज्ञान असणे आवश्यक आहे.<br>— तसेच विशेषत: अंदाजपत्रक तयार करणे, दर विश्लेषण करणे, सर्वेक्षण करणे, बांधकाम पर्यवेक्षण, निविदा दस्तऐवज तयार करणे इ.. बाबतचा अनुभव असणे आवश्यक आहे.<br>— पीएमसी / कंत्राटदार यांची देयके तपासणे.<br>— AUTOCAD चे ज्ञान असणे आवश्यक आहे.<br>— उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असावे. |
| ५ | **कनिष्ठ अभियंता (विद्युत)** | **शैक्षणिक पात्रता:** महाराष्ट्र शासन मान्य विद्यापीठातील विद्युत शाखेतील पदविका (Diploma / BE - Electrical Engineering) धारण केलेली असावी.<br>**अनुभव व कार्ये :-**<br>— शासकीय/निमशासकीय/मंडळे/महामंडळे/सरकारी उपक्रमे अथवा नोंदणीकृत सुप्रस्थापित खाजगी कंपनी/ फर्म इ.. कार्यालयातील ०७ वर्षापेक्षा जास्त कालावधीचा कामाचा अनुभव असावा.<br>— केंद्रशासनाच्या व राज्यशासनाचे विविध गृहनिर्माण योजना राबविण्याचा, मंजुरी प्राप्त करण्याचा, पर्यवेक्षणाचा, विश्लेषणाचा अनुभव.<br>— विस्तृत इलेक्ट्रिकल बिल्डींग सेवा, अभियांत्रिकी डिझाइन आणि विश्लेषण मध्ये किमान ०५ वर्षाचा अनुभव.<br>— Estimating load requirements, designing LT/HT power distribution, internal electrification चे ज्ञान असणे आवश्यक.<br>— Electrical safety codes, IE Rules व लागू असलेल्या सर्व नियम याबाबत अद्ययावत असणे आवश्यक.<br>— महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध गृहप्रकल्प साईटवर काम करण्याची तयारी असणे आवश्यक.<br>— साईटवरील कामाचे पर्यवेक्षण करणे.<br>— विद्युत सेवा कनेक्शनसाठी स्थानिक विद्युत प्राधिकरणांशी संवाद साधणे.<br>— AUTOCAD चे ज्ञान असणे आवश्यक आहे.<br>— उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असावे. |
| ६ | **सहाय्यक नगररचनाकार (Assistant Town Planner)** | **शैक्षणिक पात्रता:** महाराष्ट्र शासन मान्य विद्यापीठातील शहरी नियोजन या विषयातील पदवी / पदव्युत्तर पदवी धारण केलेली असावी. पदवी ही इन्स्टिट्यूट ऑफ टाऊन प्लॅनर्स, इंडिया (ITPI) किंवा समतुल्य व्यावसायिक संस्थेकडून मान्यताप्राप्त असणे आवश्यक आहे.<br>**अनुभव व कार्ये :-**<br>— शहरी नियोजन प्रामुख्याने शासकीय / निमशासकीय संस्था, सार्वजनिक उपक्रम कंपनी किंवा शहरी स्थानिक मंडळामध्ये Assistant Town Planner म्हणून सेवानिवृत्त असल्यास प्राधान्य.<br>— शहरी नियोजन प्रामुख्याने शासकीय / निमशासकीय संस्था, सार्वजनिक उपक्रम कंपनी किंवा शहरी स्थानिक मंडळामध्ये Assistant Town Planner म्हणून किमान १० वर्षांचा अनुभव असणे आवश्यक.<br>— Unified Development Control and Promotion Regulations (DCPR), Development Control and Promotion Regulations २०३४ (DCPR), |

| | | |
|---|---|---|
| | | याबाबत अद्ययावत ज्ञान असणे आवश्यक आहे.<br>— National Building Code, Fire, structural and accessibility norms याबाबत अद्ययावत ज्ञान असणे आवश्यक.<br>— केंद्रशासनाच्या व राज्यशासनाचे विविध गृहनिर्माण योजना राबविण्याचा, मंजुरी प्राप्त करण्याचा, पर्यवेक्षणाचा, विश्लेषणाचा अनुभव.<br>— मोठया आकारमानाचा गृहनिर्माण प्रकल्प परवडणाऱ्या दरात राबविण्याचा अनुभव असणे आवश्यक.<br>— Architectural design, building design, working drawings, presentation drawings, layout planning and ३D visualizations चे ज्ञान असणे आवश्यक.<br>— पीएमसीने प्लॅनिंगच्या दृष्टीकोनातून सादर केलेल्या प्लॅनची छाननी व पुर्नरावलोकन करणे.<br>— सध्याच्या विकास योजनांवर आधारित विकास प्रस्ताव तयार करणे आणि धोरणांची शिफारस करणे.<br>— साईट पाहणी करणे व त्याअनुषंगाने प्लॅनिंग करण्याचा अनुभव असणे आवश्यक.<br>— AUTOCAD, Revit, Sketch Up, Photoshop, ३ds Max (desirable) चे ज्ञान असणे आवश्यक.<br>— उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असावे. |
| ७ | **वास्तुविशारद**<br>**(Architect)** | **शैक्षणिक पात्रता:** महाराष्ट्र शासन मान्य विद्यापीठातील वास्तुशास्त्र / वास्तुविशारद पदवी / पदव्युत्तर पदवी धारण केलेली असावी. Council of Architecture, नवी दिल्ली यांचे सक्रिय नोंदणीकृत सदस्य असावे.<br>**अनुभव व कार्ये :-**<br>— शहरी नियोजन प्रामुख्याने शासकीय / निमशासकीय संस्था किंवा शहरी स्थानिक मंडळामध्ये वास्तुविशारद म्हणून किमान ०७ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक.<br>— Unified Development Control and Promotion Regulations (DCPR), Development Control and Promotion Regulations २०३४ (DCPR), याबाबत अद्ययावत ज्ञान असणे आवश्यक आहे.<br>— National Building Code, Fire, structural and accessibility norms याबाबत अद्ययावत ज्ञान असणे आवश्यक.<br>— केंद्रशासनाच्या व राज्यशासनाचे विविध गृहनिर्माण योजना राबविण्याचा, मंजुरी प्राप्त करण्याचा, पर्यवेक्षणाचा, विश्लेषणाचा अनुभव.<br>— Architectural design, building design, Working drawings, presentation drawings, layout planning and ३D visualizations चे ज्ञान असणे आवश्यक.<br>— पीएमसीने प्लॅनिंगच्या दृष्टीकोनातून सादर केलेल्या प्लॅनची छाननी व पुर्नरावलोकन करणे.<br>— सध्याच्या विकास योजनांवर आधारित विकास प्रस्ताव तयार करणे आणि धोरणांची शिफारस करणे.<br>— साईट पाहणी करणे व त्याअनुषंगाने प्लॅनिंग करण्याचा अनुभव असणे आवश्यक.<br>— AUTOCAD, Revit, Sketch Up, Photoshop, ३ds Max (desirable) चे ज्ञान असणे आवश्यक.<br>— उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असावे. |

| | | |
|---|---|---|
| ८ | **आरेखक (Draftsman)** | **शैक्षणिक पात्रता:** मान्यताप्राप्त विद्यापीठातून डिप्लोमा/ पदवी / पदव्युत्तर पदवी धारण केलेली असावी.शासन मान्यताप्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची आरेखन या विषयाची प्रमाणपत्र परीक्षा प्रथम क्षेणीत उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>**अनुभव व कार्ये :-**<br>— आर्किटेक्चरल + स्ट्रक्चरल रेखांकन मध्ये किमान ०७ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक.<br>— AUTOCAD चे ज्ञान असणे आवश्यक तसेच वास्तुशिल्प डिझाइन कार्य आणि रेखाचित्र तयार करणे आणि समजणे आवश्यक आहे.<br>— Unified Development Control and Promotion Regulations (DCPR), Development Control and Promotion Regulations २०३४ (DCPR), याबाबत अद्ययावत ज्ञान असणे आवश्यक आहे.<br>— साईट तपासणी करणे व त्याअनुषंगाने प्लॅनिंग करणे.<br>— उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असावे. |
| ९ | **सहाय्यक / कनिष्ठ अधिकारी (प्रशासन/जमिन)** | **शैक्षणिक पात्रता:** महाराष्ट्र शासन मान्य विद्यापीठातील पदवी / पदव्युत्तर पदवी धारण केलेली असावी.<br>**अनुभव व कार्ये :-**<br>— मंत्रालयीन सेवेतील कक्ष अधिकारी पदावरुन सेवानिवृत्त अधिकारी अथवा मंत्रालयीन सेवेतील कक्ष अधिकारी म्हणून किमान ०७ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक.<br>किंवा<br>— नोंदणीकृत सुप्रस्थापित खाजगी कंपनी कार्यालयातील किमान ०७ वर्षापेक्षा जास्त कालावधीचा प्रशासकीय / जमिन विभागातील कामकाजाचा अनुभव असणे आवश्यक.<br>— सेवानिवृत्त अधिकारी शारिरीक, मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने प्रस्तावित सेवेसाठी सक्षम असणे आवश्यक आहे.<br>— सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या विरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी तसेच वर्तणूकीबाबतचा खटला चालू नसावा.<br>— महाराष्ट्र नागरी सेवा, आस्थापना, कंत्राटी पध्दतीवरील सेवा विषयक बाबी हाताळणे, टिप्पणीलेखन, विविध प्रस्ताव विश्लेषण अशा सर्व बाबींबाबतचे ज्ञान असणे आवश्यक.<br>— प्रशासन / जमिन विभागातील सर्व कामकाज प्रभावीपणे हाताळण्याचा अनुभव असणे आवश्यक.<br>— कार्यालयीन विधीविषयक बाबी हाताळण्याचा अनुभवास प्राधान्य.<br>— प्रशासकीय कामाचे ज्ञान आणि मराठी भाषेवर (लिहिणे, वाचणे आणि बोलणे) उत्तम प्रभुत्व असणे बंधनकारक आहे.<br>— प्रशासन विभागातील सर्व कामकाजाचा अनुभव असणे आवश्यक. |
| १० | **कनिष्ठ अधिकारी (जमिन) नायब तहसीलदार** | **शैक्षणिक पात्रता:** महाराष्ट्र शासन मान्य विद्यापीठातील पदवी / पदव्युत्तर पदवी धारण केलेली असावी.<br>**अनुभव व कार्ये :-**<br>— राज्य शासनाच्या शासकीय सेवेतून नायब तहसीलदार पदावरुन सेवानिवृत्त अधिकारी.<br>— राज्य शासनाच्या शासकीय सेवेत नायब तहसीलदार म्हणून किमान १२ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक. |

| | | |
|---|---|---|
| | | – सेवा निवृत्त अधिकारी शारिरीक, मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने प्रस्तावित सेवेसाठी सक्षम असणे आवश्यक आहे.<br>– प्रशासकीय कामाचे ज्ञान आणि मराठी भाषेवर (लिहिणे, वाचणे आणि बोलणे) उत्तम प्रभुत्व असणे बंधनकारक आहे.<br>– सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या विरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी तसेच वर्तणूकीबाबतचा खटला चालू नसावा.<br>– जमिन संपादन, पडताळणी, मोजमाप आणि जमिनीशी संबंधित नोंदी तसेच जमिन विभागातील सर्व कामकाजाचा अनुभव असणे आवश्यक. |
| ११ | **संचालक (लेखा व वित्त)** | **शैक्षणिक पात्रता**: महाराष्ट्र शासन मान्य विद्यापीठातील वाणिज्य शाखेतील पदवी /Accounting and Finance यामध्ये पदव्युत्तर पदवी धारण केलेली असावी. मान्यताप्राप्त विद्यापीठांची CA Inter / ICWA Inter / व्यवस्थापनातील (MBA) (Finance) किमान B+ किंवा तत्सम श्रेणी असलेल्यांना प्राधान्य.<br>**अनुभव व कार्य :-**<br>– महाराष्ट्र शासनाच्या कोणत्याही वित्त व लेखा कार्यालयातील उपसंचालक (लेखा व वित्त) या पदावरुन सेवानिवृत्त.<br>– महाराष्ट्र शासनातील कोणत्याही वित्त व लेखा कार्यालयातील लेखा अधिकारी, गट - अ किंवा त्यावरील वरिष्ठ पदाचा किमान १५ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे.<br>– निमशासकीय संस्थेत मुख्य लेखाधिकारी म्हणून किमान १५ वर्षे कामकाजाचा अनुभव असणे आवश्यक.<br>– महाराष्ट्र प्रशासकीय सेवा, वित्त व्यवस्थापन व बजेट संदर्भातील अनुभव असणाऱ्या उमेदवारास प्राधान्य.<br>– वित्त व लेखा विभागांचे धोरणात्मक नियोजन, पर्यवेक्षण व नियंत्रण करणे.<br>– वार्षिक अर्थसंकल्प, वित्तीय नियोजन, निधी व्यवस्थापन व Cash Flow वर देखरेख ठेवणे.<br>– वार्षिक आर्थिक विवरणपत्रे, Final Accounts, Notes to Accounts यांची अंतिम पडताळणी व मंजुरीसाठी सादर करणे.<br>– Internal Financial Controls व Risk Management प्रभावीपणे राबविणे.<br>– CAG, AG Audit, Statutory Audit, Internal Audit तसेच इतर विभागीय लेखापरीक्षणांचे समन्वयन व अनुपालन सुनिश्चित करणे.<br>– GST, TDS, Income Tax, SFT Return, PF, ESIC, PT तसेच इतर वैधानिक अनुपालन वेळेत पूर्ण करण्यासाठी देखरेख ठेवणे.<br>– आयकर अधिनियम, भारतीय कंपनी अधिनियम, जीएसटी अधिनियम तसेच इतर लागू कायद्यांनुसार संस्थेचे अनुपालन सुनिश्चित करणे.<br>– तिमाही Advance Tax परिगणना व भरण्यावर देखरेख ठेवणे.<br>– MCA/ROC Compliance संदर्भातील वित्तीय माहितीची अंतिम पडताळणी कारणे.<br>– शासकीय, निमशासकीय, नियामक संस्था, CAG, AG, ROC, Income Tax, GST तसेच इतर विभागांना सादर करण्यात येणाऱ्या वित्तीय माहितीवर नियंत्रण ठेवणे.<br>– प्रकल्पाकरिता आवश्यक कर्ज प्रक्रिया मंजुरीचा अनुभव आवश्यक. |

| | | |
|---|---|---|
| | | — मोठया आकारमानाच्या गृहप्रकल्प राबविण्याकरिता आवश्यक निधी उभारणे तसेच प्रकल्प आर्थिक व्यवहार्यता अहवाल व तत्सम बाबींचा अनुभव आवश्यक.<br>— व्यवस्थापन, संचालक मंडळ व शासनास आवश्यक वित्तीय अहवाल, MIS व विश्लेषणात्मक अहवाल सादर करणे.<br>— अधिनस्त अधिकाऱ्यांना मार्गदर्शन, कार्यनियोजन व नियंत्रण करणे. |
| १२ | **लेखाधिकारी** | **शैक्षणिक पात्रता:** महाराष्ट्र शासन मान्य विद्यापीठातील वाणिज्य शाखेतील पदवी / Accounting and Finance यामध्ये पदव्युत्तर पदवी धारण केलेली असावी. मान्यताप्राप्त विद्यापीठाची CA Inter / ICWA Inter / वित्तीय व्यवस्थापनातील (MBA) (Finance) किमान B+ किंवा तत्सम श्रेणी असल्यास प्राधान्य.<br>**अनुभव व कार्ये :-**<br>— महाराष्ट्र शासनाच्या कोणत्याही वित्त व लेखा कार्यालयातील सेवानिवृत्त लेखाधिकारी यांस प्राधान्य.<br>— महाराष्ट्र शासनातील कोणत्याही वित्त व लेखा कार्यालयातील लेखा अधिकारी, गट-अ या पदांच्या किमान १२ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक.<br>— निमशासकीय संस्थेत लेखाधिकारी म्हणून किमान १२ वर्ष कामकाजाचा अनुभव असणे आवश्यक.<br>— महाराष्ट्र प्रशासन सेवा, वित्त व्यवस्थापन व बजेट संदर्भातील अनुभव असणाऱ्या उमेदवारास प्राधान्य.<br>— Book of Account, Ledger, Journal, Cash Book व इतर लेखा अभिलेखे पडताळणी करुन अद्ययावत ठेवणे व Finalization करणे.<br>— Bank Reconciliation, vendor Reconciliation, Customer Reconciliation, तसेच इतर खात्याचे ताळमेळ करणे.<br>— आर्थिक विवरण पत्रे, Schedules, Notes to Account व Annexure तयार करण्यास सह्हाय करणे.<br>— GST, TDS, Income Tax Return, SFT Return PF, ESIC, PT तसेच वैधानिक परतावे तयार करणे, पडताळणी करणे व वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली वेळेत दाखल करणे.<br>— तिमाही Advance Tax परिगणना तपासून वेळेत भरणा सुनिश्चित करणे.<br>— GST, Income Tax, CAG/AG, Statutory Audit, Internal Audit तसेच इतर विभागीय लेखापरिक्षणासाठी आवश्यक कागदपत्रे, माहिती व स्पष्टीकरण तयार करुन उपलब्ध करुन देणे.<br>— Audit निरिक्षणांवरिल अनुपालनासाठी आवश्यक कार्यवाही करणे.<br>— आयकर अधिनियम, भारतीय कंपनी अधिनियम, जीएसटी अधिनियम तसेच इतर लागू कायद्यांनूसार आवश्यक लेखा अभिलेखे अद्ययावत ठेवणे.<br>— Cash Flow तयार करणे.<br>— Tally ERP/ Tally Prime तसेच संस्थेमध्ये वापरण्यात येणाऱ्या ERP/ Accounting Software मध्ये लेखा नोंदी करणे व आवश्यक अहवाल तयार करणे.<br>— Fixed Asset Register, Depreciation Register, Investment Register, Security Deposit Register, Advance Register तसेच इतर आवश्यक नोंदवही अद्यावत ठेवणे व त्यांची पडताळणी करणे. |

| | | |
|---|---|---|
| | | — GST Portal, Income Tax Portal, TRACES Portal, MCA Portal तसेच इतर शासकीय पोर्टलवरील लेखा व करसंबंधित कामकाजासाठी आवश्यक माहिती तयार करुन संबंधित कार्यवाही करणे.<br>— MCA /ROC Compliance साठी आवश्यक Financial Statements, Schedules, Annexures व इतर वित्तीय माहिती तयार करुन पुढील कार्यवाही करणे.<br>— शासकीय, निमशासकीय, नियामक संस्था, बँका, लेखापरीक्षक तसेच इतर विभागांना सादर करण्यात येणाऱ्या माहितीची पळताळणी करुन वेळेत सादर होईल याची खात्री करणे.<br>— महिनाअखेर/ आर्थिक वर्षअखेर आवश्यक Provision, Accrual, Adjustment entries करुन Final accounts तयार करणे.<br>— वरिष्ठांनी वेळोवेळी सोपविलेली लेखा, वित्त कर व वैधानिक अनुपालनाशी संबंधित इतर कामे पार पाडणे. |
| १३ | **सहाय्यक विपणन अधिकारी** | **शैक्षणिक पात्रता:** मान्यताप्राप्त विद्यापीठाची MBA/पदव्युत्तर पदवी धारण केलेली असावी. Marketing/Digital Marketing /Branding या संदर्भातील पदवी/ पदविका / शासन मान्य कोसेर्स केलेले असल्यास प्राधान्य.<br>**अनुभव व कार्ये :-**<br>— शासकीय/निमशासकीय/मंडळे/महामंडळे/सरकारी उपक्रमे अथवा नोंदणीकृत सुप्रस्थापित खाजगी कंपनी/ फर्म इ.. कार्यालयाच्या विपणन विभागातील सेवानिवृत्त अधिकारी असल्यास प्राधान्य.<br>— शासकीय/निमशासकीय/मंडळे/महामंडळे/सरकारी उपक्रमे अथवा नोंदणीकृत सुप्रस्थापित खाजगी कंपनी/ फर्म इ.. कार्यालयातील विपणन विभागातील किमान ०७ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक.<br>— केंद्रीय/राज्य स्तरावरील योजनांशी संबंधित शासकीय यंत्रणांसमवेत प्रकल्प हाताळण्याचा किमान ०७ वर्ष अनुभव आवश्यक.<br>— प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) शी संबंधित Public Financial Management System (PFMS), Management Information System (MIS) बाबी हाताळण्याचा तसेच तत्सम शहरी भागातील योजनांशी संबंधित शासकीय / निमशासकीय संस्थासमवेत कामकाजाचा अनुभव आवश्यक.<br>— विक्री आणि मार्केटिंग क्षेत्रातील किमान ०७ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक. प्रामुख्याने गृहनिर्माण आणि सरकारी संस्थेत भूसंपत्ती किंवा सार्वजनिक उपक्रम कंपनी.<br>— संस्थात्मक ध्येयांच्या अनुषंगाने विपणन अंदाजपत्रक तयार करणे.<br>— जाहिरात मोहिमांचे पुनरावलोकन, विपणन अहवाल, विक्रेता करार आणि खर्च यांची समीक्षा करणे आणि मंजूर करणे.<br>— संपूर्ण पीआर, कार्यक्रम आणि इतर संभाषण धोरणे व्यवस्थापित केली पाहिजेत.<br>**Expected Skills :-**<br>Project Management: Excellent organizational and project management skills to handle multiple campaigns and projects simultaneously.<br>Analytical Skills: Ability to analyze market trends, customer data, and campaign performance to make data-driven decisions.<br>Leadership: Ability to lead and manage marketing teams.<br>Communication Skills: Excellent written and verbal communication |

| | | |
|---|---|---|
| | | skills for creating marketing materials, reports and presentations.<br>Creativity: Ability to develop innovative marketing campaigns and strategies.<br>Technical Skills: Proficiency with marketing tools and platforms (e.g., Google Analytics, Public Financial Management System (PFMS), Management Information System (MIS), CRM software, marketing automation tools).<br>Strategic Thinking: Strong strategic planning skills to align marketing efforts with business goals<br>Marketing Skills: Strong understanding of marketing principles, strategies, tactics, including digital marketing, SEO/SEM, social media, content marketing, and branding. |
| १४ | **लिपिक टंकलेखक (Clerk cum Typist)** | **शैक्षणिक पात्रता:** महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त विद्यापीठातील पदवी धारण केलेली असावी. आस्थापना/जमिन/लेखा व वित्त/तांत्रिक (Civil)/विपणन या विषयातील विशेष ज्ञान व अनुभव असणाऱ्यांना प्राधान्य.<br>**अनुभव व कार्ये :-**<br>— शासकीय/निमशासकीय/मंडळे/महामंडळे/सरकारी उपक्रमे अथवा नोंदणीकृत सुप्रस्थापित खाजगी कंपनी/ फर्म इ.. कार्यालयातील ०५ वर्षापेक्षा जास्त कालावधीचा कामाचा अनुभव असावा.<br>— आस्थापना/जमिन/लेखा व वित्त/तांत्रिक/विपणन अशा विविध विभागातील कामकाजाचा अनुभव असणे आवश्यक.<br>— शासकीय कार्यालयातील पत्रांचे मसुदे, कार्यालयीन टिप्पणी, बैठकींचे इतिवृत्त तयार करण्याचे ज्ञान असणे आवश्यक.<br>— मराठी टंकलेखनाचे किमान ३० श.प्र.मि वेगमर्यादा व इंग्रजी टंकलेखनाचे किमान ४० श.प्र.मि. वेगमर्यादा याचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र किंवा संगणक टंकलेखनाचे प्रमाणपत्र आवश्यक.<br>— तसेच MS-CIT, Tally-ERP असणे आवश्यक.<br>— संगणकीय ज्ञान असणे आवश्यक.<br>— उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असावे. |
| १५ | **शिपाई** | **शैक्षणिक पात्रता:** दहावी ची परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी.<br>**अनुभव व कार्ये :-**<br>— शासकीय / निमशासकीय संस्था/ खाजगी संस्थेतील सेवानिवृत्त शिपाई म्हणून कामकाजाचा अनुभव असणाऱ्यांना प्राधान्य.<br>— निमशासकीय संस्था व खाजगी संस्थेत किमान ०५ वर्ष कामकाजाचा अनुभव.<br>— उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असावे. |

**टिप:**

१. उपरोक्त पदासाठी पात्रता निकष पूर्ण करणाऱ्या उमेदवारांची मुलाखतीद्वारे निवड करण्यात येईल.

२. योग्य उमेदवार प्राप्त झाल्यास प्रत्येक पदासाठी १:३ प्रमाणात निवडसूची तयार करण्याचे अधिकार महामंडळास राहतील.

३. महाहौसिंगमार्फत तयार करण्यात आलेल्या अंतिम निवडसूचीमधील उमेदवाराची महाहौसिंगच्या कामकाजाच्या आवश्यकतेप्रमाणे नियुक्ती करण्यात येईल.

४. उमेदवाराची गुणवत्ता व पदासाठीचा असलेला अनुभव विचारात घेऊन त्याचे दरमहा ठोक पारिश्रमिक निश्चित करण्याचे तसेच कमी जास्त करण्याचे अधिकार महामंडळास राहतील.

५. उपरोक्त पदांवरील भरती ही महामंडळाद्वारे वेळोवेळी ठरविलेल्या शर्ती व अटींच्या अधीन राहील, तसेच उपरोक्त पदांचा कालावधी कमी/अधिक करण्याचा अधिकार महामंडळास राहील.

**इतर अटी व शर्ती-:**

१. अर्ज विहित नमुन्यात स्वहस्ताक्षरात सर्व दृष्टिने पूर्ण असावा, विहित नमुन्यामध्ये नसलेले व अपूर्ण अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

२. उमेदवारांनी विहित नमुन्यातील संपूर्ण भरलेला अर्ज, अलिकडील फोटो तसेच शैक्षणिक अर्हतांची गुणपत्रक / प्रमाणपत्र कागदपत्रे) सर्व गुणपत्रकांसहित (व पदवी / पदव्युत्तर प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्र व मुलाखतीच्या अनुषंगाने इतर आवश्यक मुळ कागदपत्रांच्या स्वयंसाक्षांकित प्रतीचा एक संच आपल्या अर्जासोबत जोडावा व मुलाखतीस मूळ कागदपत्रांसह हजर रहावे .

३. उमेदवार विहित अर्हता व अटी पूर्ण करीत नसल्याचे कोणत्याही क्षणी निदर्शनास आल्यास त्यांची उमेदवारी रद्द करण्यात येईल.

४. निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यावर उमेदवाराने चुकीची माहिती/प्रमाणपत्र/कागदपत्रे सादर केल्याचे, दिशाभूल केल्याचे अथवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारास निवड प्रक्रियेतून बाद ठरविण्यात येईल.

५. निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र/अयशस्वी ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

६. पत्र व्यवहाराचा पत्ता सुस्पष्ट व पुर्ण असावा.

७. निवड प्रक्रियेसंदर्भात उमेदवारांशी करण्यात येणारा संपूर्ण पत्रव्यवहार आणि सूचना या उमेदवारांनी अर्जात नमूद केलेल्या ई-मेल आयडी वरच कळवण्यात येतील, त्यामुळे उमेदवारांनी मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी अर्जात काळजीपूर्वक व अचूक नमूद करावा.

८. सेवानिवृत्त अधिकाऱ्यांचे वय 62 वर्षापेक्षा अधिक नसावे. उमेदवाराने अर्जासोबत वयाचा दाखला म्हणून शाळा सोडल्याचा दाखला किवा माध्यमिक शालांत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

९. सेवानिवृत्त अधिकारी शारीरिक, मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्यांच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

१०.नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विवक्षित काम पूर्ण करण्याची जवाबदारी संबंधित व्यक्तीची राहील व तसे बंधपत्र/हमीपत्र त्यांच्याकडून घेण्यात येईल.

११.सेवानिवृत्त अधिका-याविरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू अगर प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

१२.सेवानिवृत्त अधिकाऱ्यांविरुध्द कोणताही गुन्हा नोंदविला नाही अथवा सिध्द झालेला नाही याबाबतचे संबंधित पोलीस स्टेशनचे पत्र नेमणूकीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

१३.उमेदवारास मुलाखतीकरिता स्वखर्चाने यावे लागेल व मुलाखतीकरिता येणारा खर्च कार्यालयामार्फत दिला जाणार नाही.

१४.नियुक्तीनंतर उमेदवारास निवासस्थान उपलब्ध करून देण्याची जबाबदारी या कार्यालयाची असणार नाही.

१५.अधिकारी/कर्मचारी यांच्यावर सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतता येणार नाही.

१६.अधिकारी/कर्मचारी यांनी गुंतलेले हितसंबंध (Conflict of Interest) जाहीर करणे आवश्यक राहील.

१७.करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने त्याला कंत्राटी कालावधी दरम्यान प्राप्त होणारी कागदपत्रे /माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील .सदर माहितीचा गैरवापर, दृष्टोत्पत्तीस आल्यास संबंधित अधिकारी व्यक्तीशः जबाबदार राहील, या माहितीची गोपनियता बाळगणे तसेच महाहौसिंगला कोणतीही हानी पोहचणार नाही याची दक्षता, काळजी घेण्याची जबाबदारी या संबंधित अधिकाऱ्याची असेल.

१८.सक्षम प्राधिकारी यांना कंत्राटी अधिकारी यांची संशयास्पद वर्तणूक, हालचाल निदर्शनास आल्यास त्यांचा कंत्राटी सेवा कालावधी कोणतीही पूर्व सूचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येईल.

१९.सेवानिवृत्त अधिकारी यांनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील .त्यांच्या कामकाजाबाबत सक्षम प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मूल्यमापन करतील.

२०.करार पद्धतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत /सामावून घेण्याबाबतचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार / हक्क नसेल.

२१.नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त/स्वेच्छा सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/कर्मचारी यांना कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ, पुनर्नियुक्ती देण्यात येणार नाही.

२२.निवडीसाठी शिफारस अथवा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास सदर उमेदवारास निवड व नियुक्तीच्या प्रक्रियेतून अपात्र ठरविण्यात येईल.

२३.सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अधिका-यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

२४.गुणवत्तेच्या आधारे तयार केलेली प्रतिक्षासुची आवश्यकतेनुसार परंतु जास्तीत जास्त एक वर्षापर्यंत ग्राहय धरण्यात येईल, तद्नंतर आपसूकच रदद होईल.

२५.शासनाने भरतीबाबत /नियुक्तीबाबत वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसूचना व शासन निर्णय, परिपत्रके, आदेश इत्यादी या भरती प्रकियाला लागू राहतील.

**महत्वाच्या विशेष सूचना :**

१. सदर करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आलेल्या सेवानिवृत्त अधिकारी यांच्या पदाचा सेवा कालावधी नियुक्तीपासून प्रथमतः १ वर्षाचा असेल मात्र त्या पुढील कालावधी त्यावेळेची निकड, गरज तथा आवश्यकता पाहून संबंधित अधिकाऱ्याची कार्यतत्परता आणि गुणवत्तेच्या आधारे सेवा कालावधीमध्ये अधिकम तीन वर्षापर्यंत मात्र दरवर्षी नुतनीकरणाने वाढ होऊ शकेल .

२. तसेच, ज्या पदांवर खाजगी क्षेत्रातील शैक्षणिक अर्हता व अनुभव पूर्ण करीत असलेले उमेदवार अर्ज करतील अशा उमेदवारांना प्रथमत: 11 महिन्यांच्या कालावधीसाठी करार तत्त्वावर तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक करण्यात येईल. तदनंतर पुढील कालावधी त्यावेळेची निकड, गरज तथा आवश्यकता पाहून संबंधित अधिकाऱ्याची कार्यतत्परता आणि गुणवत्तेच्या आधारे वाढवून देण्यात येईल.

३. मासिक पारिश्रामिक हे कंत्राटी नियुक्तीसाठी असलेले शासन निर्णय व वेळोवेळी निर्गमित करण्यात येणाऱ्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार अनुज्ञेय राहतील.

४. नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विवक्षित्त काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित अधिका-याची राहील तसेच विहित केलेल्या अटी व शर्ती तसेच निश्चित केलेल्या अतिरिक्त अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचा व नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींकडून नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करण्यात येणार नाही, या आशयाचे बंधपत्र देणे आवश्यक राहील.

५. प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस किवा कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार मा .व्यवस्थापकीय संचालक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाहौसिंग यांना राहतील.

६. निवड झालेला उमेदवार जर ७ दिवसांत नियुक्तीच्या ठिकाणी हजर न झाल्यास संबंधित सेवानिवृत्त अधिकाऱ्यास स्वारस्य नाही, असे समजून कोणत्याही प्रकारची पूर्वसूचना न देता सेवानिवृत्त अधिकाऱ्याची नियुक्ती रद्द करण्यात येईल.

**ठिकाण -:मुंबई.**

**सही/-**

**(टि.डी.कासार)**

**व्यवस्थापकीय संचालक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,**

**महाहौसिंग**